# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोन नं. ०२२-२९४५१००१.

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट ३९७-२२ दिनांक २९/१२/२०२२

## इलेक्ट्रीसिटी बिलाबाबत फसवणूक झालेली रक्कम ९७,०५७/- रुपये परत मिळविण्यात नालासोपारा पोलीस ठाण्याला यश.

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत नालासोपारा परिसरातील रिलायबल कॉम्प्लेक्स निळेमोरे नालासोपारा प. ता- वसई,जि- पालघर येथे राहणारे तक्रारदार सौ. दिपाली विश्वास देशमुख यांना दिनांक २४/०८/२०२२ रोजी १०.०० वाजताच्या सुमारास त्यांचे मोबाईलवर एक अनोळखी इसम एम. एस. ई. बी. मधुन बोलत असल्याचे भासवून तुमचे निळेगाव येथील राहते रुमचे विजेचे बिल भरणे बाकी आहे ते न भरल्यास विज पुरवठा खंडीत होईल. सदर विजपुरवठा अखंडीत चालू ठेवण्याकरीता तात्काळ ऑनलाईन बिल भरा असे सांगुन त्याने तक्रारदार यांना एक लिंक पाठविली. सदरची लिंक तक्रारदार यांनी ओपन केली असता त्यावर **TeamViewer** हया ॲपलिकेशनद्वारे अनोळखी इसमाने तक्रारदार यांचे बँक खाते मधुन पहिल्यांदा ४८,५२८/- रुपये त्यानंतर लगेचच ४८,५२९/- रुपयांचे ट्रांझीक्शन केले. त्यावेळी तक्रारदार यांचे अकाऊंटमधुन एकुण ९७,०५७/- रुपये डेबिट केले असल्याचा मेसेज प्राप्त झाला. त्यानंतर तक्रारदार यांनी नालासोपारा पोलीस ठाणे येथे तक्रारी अर्ज दिनांक २४/०८/२०२२ रोजी केला होता.

नमूद तक्रारी बाबत पोलीस निरीक्षक/राहुल सोनवणे यांनी दखल घेवून तक्रारदार यांचे झाले व्यवहाराबाबत माहिती प्राप्त केली. प्राप्त माहितीचे अवलोकन केले असता तक्रारदार यांची फसवणूक रक्कम हि प्रथम पेटीएम या ऑनलाईन पेमेंट गेटवेवर गेल्याचे चौकशीमध्ये निष्पन्न झाले. त्याबाबत लागलीच पेटीएम नोडल अधिकारी यांचेशी संपर्क करुन सदरचे पैसे तात्काळ डेबिट फ्रिज करणेबाबत ई मेल करण्यात आला होता. पेटीएम नोडल अधिकारी यांनी तक्रारदार यांची फसवणुक झालेले रक्कमेबाबत पडताळणी करुन सदरची रक्कम हि थांबवुन ९७,०५७/- रुपये तक्रारदार यांचे खात्यावर वळविण्यात नालासोपारा पोलीस ठाणे यांना यश आले आहे.

**अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- अशा प्रकारे फसवे कॉल अथवा एसएसएस प्राप्त झाल्यास त्यावर कोणताही प्रतिसाद देवू नये.
- आपल्या मोबाईल क्रमांकावर प्राप्त होणारे एसएमएस, ईमेल, कॉल्स यांची विश्वासार्हतेची पडताळणी करावी.
- आपले मोबाईलवर प्राप्त होणारा **OTP** किंवा आपली वैयक्तीक माहिती देवू नये.
- तसेच फसवणुक झाल्याचे लक्षात येताच लागलीच नजीकच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा जेणेकरुन **Golden Hour Period** मध्ये फसवणुक झालेली रक्कम परत मिळविण्याकरीता मदत होईल.

. मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असे कृत्य कोणी करीत असल्याचे आढळुन आल्यास तात्काळ तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, तसेच सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे , पोलीस उप - आयुक्त, परिमंडळ ३, विरार, श्री. चंद्रकांत जाधव, सहा. पोलीस आयुक्त नालासोपारा विभाग मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक/ श्री विलास सुपे, श्री राहुल सोनवणे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), परिविक्षाधिन पोलीस उपनिरीक्षक/ योगेश मोरे यांनी पार पाडली आहे.

---ooo---